# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 14 August 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.

****

देशाच्या फाळणीत हौतात्म्य प्राप्त झालेल्यांचं आदरपूर्वक स्मरण करण्यासाठी आज देशभरात फाळणी वेदना दिवस पाळला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशातून, या दिवशीच्या आपत्तीमुळे संकटात पडलेल्या लोकांचं स्मरण करत, त्यांच्या साहसाला वंदन केलं आहे. फाळणीच्या संकटाला तोंड देऊन अनेक लोकांनी देशात आपलं जीवन नव्यानं सुरू करून पुन्हा यश मिळवलं, असं नमूद करत, एकता आणि बंधुभावाचं संरक्षण करण्याकरता देश प्रतिबद्ध आहे, असं पंतप्रधानांनी या संदेशात म्हटलं आहे.

****

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांना शौर्य पदक, विशेष सेवा पदकं आज जाहीर झाली. यामध्ये राष्ट्रपती शौर्य पदक तेलंगणा पोलिस विभागातले मुख्य हवालदार चादूवू यदैया यांना जाहीर झालं आहे. याशिवाय २१३ जणांना शौर्य पदक जाहीर झालं आहे. यामध्ये राज्यातल्या १७ जणांचा समावेश आहे.

९४ जणांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झालं असून, यामध्ये राज्यातल्या चिरंजीव राम छेबीला प्रसाद, राजेंद्र डहाळे, सतीश गोवेकर यांचा समावेश आहे. तर ७२९ जणांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक जाहीर झालं आहे. यामध्ये राज्यातल्या ३९ जणांचा समावेश आहे.

****

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज देशवासियांना संबोधित करणार आहेत. सायंकाळी सात वाजता राष्ट्रपतींचं हे भाषण आकाशवाणीवरून प्रसारित होईल.

****

हर घर तिरंगा मोहिमेनिमित्त देशभरात उत्साहाचं वातावरण असून, तिरंगा यात्रा, सेल्फी आणि तिरंगा रॅलींचा जल्लोष सुरू आहे. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीनं मुंबईत 'घरोघरी तिरंगा' अभियान उत्साहात सुरू आहे. मंत्रालय, विधानमंडळ, गेट वे ऑफ इंडिया, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकाची ऐतिहासिक वास्तू, बृहन्मुंबई महानगरपालिकेचं मुख्यालय, शासकीय कार्यालयं, रस्ते अशा प्रमुख ठिकाणी राष्ट्रध्वजाच्या रंगाची आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.
हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत आज बीड जिल्ह्यातल्या विविध शाळांमध्ये तिरंगा मिरवणूक तसंच तिरंगा मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे. चिंचपूर जिल्हा परिषद शाळेच्या वतीनं पंचाहत्तर मीटर लांबीच्या तिरंगा ध्वजाची मिरवणूक काढण्यात आली.

****

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था, डीआरडीओ नं, गौरव, या आपल्या पहिल्या ग्लाईड बॉंबची यशस्वी चाचणी घेतली आहे. ही चाचणी ओडिशाच्या किनाऱ्यावर करण्यात आल्याचं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं आहे. गौरव हा हवेमध्ये लांबवरच्या अंतरावर मारा करू शकणारा एक हजार किलोग्रॅम श्रेणीचा ग्लाईड बॉंब असून, चाचणीमध्ये त्यानं लाँग व्हीलर बेटावरच्या लक्ष्याचा अचूक भेद केला. हा बॉंब पूर्णपणे स्वदेशी आहे.

****

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिल्ली मद्य धोरण भ्रष्टाचार प्रकरणात अंतरिम जामीन देण्यास सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. यासंदर्भात केंद्रीय अन्वेषण विभाग-सीबीआय नं आपलं म्हणणं मांडावं, असे निर्देश देत न्यायालयानं या प्रकरणाची पुढची सुनावणी येत्या तेवीस तारखेला ठेवली आहे.

****

वर्ष २०२५ च्या हज यात्रेसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या यात्रेला जाण्यासाठी इच्छुकांना येत्या नऊ सप्टेंबरपर्यंत अर्ज करता येतील. केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरेन रिजिजू आणि राज्य मंत्री जॉर्ज कुरियन यांनी काल नवी दिल्लीत यासाठीच्या अर्ज प्रक्रियेची सुरुवात केली. सौदी अरेबियानं भारतासाठी सुमारे पावणेदोन लाख भाविकांचा कोटा निर्धारित केला असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. इच्छुक भाविक अर्ज करण्यासाठी भारतीय हज कमिटीचं संकेतस्थळ किंवा हज सुविधा ॲपचा वापर करू शकतात.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या ज्या पात्र महिलांच्या बँक खात्याशी आधार जोडणी झालेली नाही, अशा लाभार्थ्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक जोडून घेण्यासाठी जिल्ह्यात विशेष शिबिरांचं आयोजन करण्याचे निर्देश महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले आहेत. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत त्या काल बोलत होत्या. आधार जोडणी झाल्यावर या पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात योजनेचा लाभ मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अमृत महोत्सवी फळझाड आणि फुल पीक लागवड कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या आर्थिक मदतीचा लाभ मिळणार आहे. या योजनेत शेतकऱ्यांना त्यांच्या शेती आणि बांधावर बांबू लागवड करण्यासाठी प्रोत्साहन दिलं जात आहे. नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी शेतकऱ्यांना या योजनेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केलं आहे. या कार्यक्रमातून शेतकऱ्यांना सात लाख रुपयांपर्यंत अनुदान मिळणार आहे.

****

हवामान

येत्या दोन दिवसांत दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून, किनारपट्टी भागात सोसाट्याचे वारे वाहतील असा असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

****